महत्व भांडार / Table / 12/3/2019

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-१८
मध्यवर्ती भांडार विभाग,
क्रमांक-मभां/१२/कावि/२५८/२०१९
दि. ८/०८/२०१९.

परिपत्रक

**विषयः- निरूपयोग,दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा अतिरीक्त असलेल्या भांडार वस्तू यंत्रसामुग्री इत्यादीची विल्हेवाट लावण्यासंबधी मार्गदर्शक सुचना.......**

**संदर्भः- परिपत्रक क्र.मभां/७/कावि/१७८/१२/दि .२३/७/२०१२**

२/ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध विभागाकडील जुने/भंगार/निरुपयोगी दुरूस्त न होणारे व अतिरिक्त असलेल्या साहीत्य/उपकरणे यांची योग्य रितीने विल्हेवाट लावणेबाबत संदर्भिय परिपत्रकान्वयें सर्व विभागाना यापुर्वी मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.त्यानुसार मागिल काही वर्षात विविध विभागाकडील जुने/भंगार/निरुपयोगी साहित्य/उपकरणे हे मध्यवर्ती भांडार विभागात संबधित विभागांचे पत्रानुसार जमा करून घेण्यात आलेले आहे. सदर जुने/भंगार/निरुपयोगी साहित्याची लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे.सदर लिलाव प्रक्रिया पार पाडण्यासाठी मा.अति. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली लिलाव समिती गठीत करण्यात आली आहे. सदर लिलाव समितीची सभा दि .१७/७/२०१९ रोजी सभा मा.अति. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अति. आयुक्त कक्षात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जुने/भंगार/निरुपयोगी साहित्याबाबत काही मार्गदर्शक सुचना करण्यात आलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे.

१) प्रत्येक विभागाने त्या त्या विभागासाठी वापरण्यात आलेल्या भांडार साहित्याची निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा जास्त/अतिरिक्त असलेल्या साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी विभागस्तरावर यापुढे निर्लेखन समिती गठीत करावी.त्यानुसार सदर निर्लेखन समितीने निर्णय घेवुन निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा जास्त/अतिरिक्त झालेले साहित्य निर्लेखित करावे. तसेच ज्या विभागांनी यापुर्वी जुने/भंगार/निरुपयोगी साहित्य मध्यवर्ती भांडार विभागात जमा केले आहे त्याची पहाणी करून सदर साहित्य निरुपयोगी/भंगार व दुरूस्त न होणारे यासंदर्भात प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सादर करावे.

२) निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा जास्त/अतिरिक्त असलेले व निर्लेखन समितीने निर्लेखन केलेले साहीत्य जमा करताना निर्लेखन समितीचे खालील नमुन्यात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३) प्रमाणपत्र नमुनाः-असे प्रमाणीत करण्यात येते की,वरीलप्रमाणे साहीत्य हे जुने/भंगार/निरुपयोगी असल्याने त्याचा फेरवापर होणार नाही.तरी सदरचे जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्य नेहरूनगर गोडाउन येथे जमा करून घेणेत यावे.त्याची लिलावाव्दारे विक्री करणेस हरकत नाही.

४) जंगम मालमत्ता साहीत्याबाबत दाखला सोबत प्रपत्र क प्रमाणे सादर करावा.तसेच यापुढे निर्लेखित न केलेले पण वापरण्यायोग्य व इतर विभागांना उपयोगी असणारे साहीत्य संबधीत विभागाच्या शिफारशीनुसार भांडार विभागात ठेवण्यासाठी स्विकारले जाणार नाही.

५) निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा जास्त/अतिरिक्त असलेल्या भांडार वस्तू,यंत्रसामुग्री इत्यादीची विल्हेवाट लावण्यासंबधी परिपत्रक क्र मभां/७/कावि/१७८/१२/दि .२३/७/२०१२ अन्वयें मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.संदर्भासाठी सोबत परिपत्रक जोडले आहे.

सबब वरील प्रमाणे सर्व विभागप्रमुखांना पुन्हा या परिपत्रकाव्दारे सुचना देण्यात येत आहेत की, मध्यवर्ती भांडार विभागाकडे जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्य नेहरूनगर गोडाउन येथे जमा करताना संदर्भिय परिपत्रकातील सुचनांचे पालन करण्यात यावे.तसेच उक्त नमुद केले प्रमाणे विभागस्तरावर जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्याचे निर्लेखन करणेकामी निर्लेखन समिती गठीत करावी.व सदर समितीने प्रमाणित केल्यानंतरच जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्य मध्यवर्ती भांडार विभागाकडे जमा करण्यात यावे. निर्लेखन समितीने प्रमाणित केल्याशिवाय जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्य मध्यवर्ती भांडार विभागात यापुढे जमा करू नये.

परिपत्रकाची दखल घेवुन कार्यवाही न केलेस व तदनंतर अशाप्रकारे भंगार साहीत्य विभागामध्ये निर्लेखित न करता साठवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास प्रस्तुत प्रकरणी विभागप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.व उचीत कार्यवाही मुदतीत पुर्ण करण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-४११०१८

प्रति,

**सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुखः-** प्रत्येक विभागाने त्या त्या विभागासाठी वापरण्यात आलेल्या भांडार साहित्याची निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे अथवा गरजेपेक्षा जास्त/अतिरिक्त असलेल्या साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी आपल्या विभागस्तरावर निर्लेखन समिती गठीत करावी.

**आय.टी.आय. मोरवाडी:-** मनपाच्या गोडाउनमध्ये दुरूस्त करण्यायोग्य असलेले साहित्य(उदा.शाळांमधील लोखंडी बेचेस,लाकडी सामान,टेबल,खुर्च्या,कपाटे इ.)ची पहाणी करून आय.टी.आय.मधील विद्यार्थ्याकडुन ते दुरूस्त करवून घेतल्यास या विद्यार्थ्याच्या कौशल्य वाढीस प्रोत्साहन मिळेल याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

सहा. आयुक्त (भांडार)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४१०१०१८.

प-११२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी – ४११०१८.

नमुना- प्रपत्र क

**विभागाचे नाव:-**

जुने/निरूपयोगी भंगार साहीत्याबाबत दाखला

**सोबत मा.आयुक्त यांचे कडील परिपत्रक संदर्भ क्र.मभां/१२/कावि/२५८/२०१९/दि.८/८/२०१९ नुसार**

असे प्रमाणीत करण्यात येते की,विभागाकडुन नेहरूनगर गोडाउन येथे जमा करण्यात आलेले साहीत्य हे जुने/भंगार/निरुपयोगी असल्याने त्याचा मनपाचे कामकाजासाठी वापर होणार नाही.तरी सदरचे जुने/भंगार/निरुपयोगी साहीत्याची लिलावाव्दारे विक्री करणेस हरकत नाही.

विभाग प्रमुख/शाखा प्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.